<u>**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५**</u> <u>**निशाणी क्र. १०२ क्रमशः**</u>

साक्षीदार क्र. ६

<u>**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फेः—**</u>

शपथेवर सुरुः—

४. मी मागील तारखेस न्यायालयास अभिवचन दिल्याप्रमाणे ६ बॅकातील ९ खात्यांचे खाते उतारे न्यायालयात दाखल केलेले आहेत. मी एसबीआय बॅंक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ३४७२४१९४०४७ यावरुन दि. २१.०१.२०२१ ते दि. ०४.१०.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत यास मी रु. ३८,३५,०००/— पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. १०६** वर दाखल असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील कालावधीमध्ये ज्या रक्कमा पाठवलेल्या होत्या त्या समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. २९.०३.२०२२ ते दि. २५. १०.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने मला त्याच्या बॅक खात्यामधून सदरील खात्यावर एकूण रु. ४३,५८,५००/— पाठवले होते. ती रक्कम माझ्या खात्यात त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता—यात **(निशाणी क्र. १०६)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

५. प्रज्योत भागवत याने माझी आई श्रीमती मनिषा मारुती कोरपे हिच्या एसबीआय बॅंक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ४०९२१६६६३३० यावरुन दि. ११.०७.२०२२ ते ३०.०९.२०२४ या कालावधीमध्ये मी प्रज्योत यास रु. १४,५०,०००/— पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. १०८** वर दाखल असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील कालावधीमध्ये ज्या रक्कमा पाठवलेल्या होत्या त्या समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. ३०.०४.२०२२ ते दि. २५. १०.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने माझ्या आईच्या सदरील खात्यावर त्याच्या बॅक खात्यामधून एकूण रु. ४१,५०,०००/— पाठवले होते. ती रक्कम माझ्या आईच्या खात्यात त्याच्याकडून

वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता—यात **(निशाणी क्र. १०८)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

६. मी डोंबिवली नागरी सहकारी बॅक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ०१४०१०१०००००७२५४ या खात्यात प्रज्योत भागवत याच्याकडून दि. २५.०२.२०२३ ते दि. ३०.०९.२०२३ या कालावधीत एकूण रु. ७,८२,५००/— वर्ग करण्यात आले होते. सदरील रक्कम प्रज्योत भागवत याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या **निशाणी क्र. ११०** वरील उता—यात नमूद असून त्या नोंदी नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

७. प्रज्योत भागवत याने माझी आई श्रीमती मनिषा मारुती कोरपे हिच्या डोंबिवली नागरी सहकारी बॅक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ०१४०१०१०१४०४६७२ यावरुन दि. २८.०१.२०२१ ते ०४.०४.२०२२ या कालावधीमध्ये मी प्रज्योत यास रु. ३८,३८,०००/— पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. ११२** वर दाखल असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील कालावधीमध्ये ज्या रक्कमा पाठवलेल्या होत्या त्या समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. २२.०१.२०२१ ते दि. २५.०२.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने माझ्या आईच्या सदरील खात्यावर त्याच्या बॅक खात्यामधून एकूण रु. ४२,३४,५२०/— पाठवले होते. ती रक्कम माझ्या आईच्या खात्यात त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता—यात **(निशाणी क्र. ११२)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

८. प्रज्योत भागवत याने माझी मेहूणी कुमारी. शिवानी विजय गायकवाड हिच्या एसबीआय बॅक, शाखा वर्तकनगर ठाणे येथिल खाते क्र. ४११५५८२१३६७ यावरुन दि. ०१.०५.२०२४ रोजी मी प्रज्योत यास रु. ५०,०००/— पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. ११४** वर दाखल

असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील कालावधीमध्ये ज्या रक्कमा पाठवलेल्या होत्या त्या समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. २५.०८.२०२२ ते दि. २५.०४.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने माझ्या मेहूणीच्या सदरील खात्यावर त्याच्या बॅक खात्यामधून एकूण रु. १३,६७,०००/– पाठवले होते. ती रक्कम माझ्या मेहूणीच्या खात्यात त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता–यात **(निशाणी क्र. ११४)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

९. प्रज्योत भागवत याने माझी पत्नी सौ. वैष्नवी राहुल कोरपे हिच्या एसबीआय बॅक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ४१६६६८५५७३८ यावरुन दि. ०१.०५.२०२४ ते ०६.१०.२०२४ या कालावधीमध्ये मी प्रज्योत यास रु. १२,५०,०००/– पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. ११६** वर दाखल असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील कालावधीमध्ये ज्या रक्कमा पाठवलेल्या होत्या त्या समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. १२.०४.२०२३ ते दि. २६.०८.२०२३ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने माझ्या पत्नीच्या सदरील खात्यावर त्याच्या बॅक खात्यामधून एकूण रु. ४,४०,०००/– पाठवले होते. ती रक्कम माझ्या पत्नीच्या खात्यात त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता–यात **(निशाणी क्र. ११६)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

१०. मी ॲक्सिस बॅक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ९२२०१००६१८०२१६० यावरुन दि. ०३.१०.२०२४ रोजी प्रज्योत यास मी रु. ०४,५०,०००/– पाठवले होते. त्याचा खाते उतारा **निशणाी क्र. ११८** वर दाखल असून तो आता मला दाखवण्यात आला. मी त्या खाते उतारामध्ये वरील दिनांकास जी रक्कम पाठवलेली होती ती समजण्यासाठी त्याच्या भोवती लाल शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे. त्यानंतर दि. १५.१२.२०२२ ते दि. २७.०९.

२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत भागवत ने मला त्याच्या बॅक खात्यामधून सदरील खात्यावर एकूण रु. १७,३०,०००/— पाठवले होते. ती रक्कम माझ्या खात्यात त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता—यात **(निशाणी क्र. ११८)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

११. मी कर्नाटका बॅक, शाखा ठाकुर्ली येथिल खाते क्र. ९९९२५०५०१०५२८७०१ या खात्यावर प्रज्योत भागवतने दि. १८.०४.२०२३ ते दि. ३०.०७.२०२४ या कालावधीत मला रु २२,८६,०००/— ऐवढी रक्कम पाठवली होती. त्याच्याकडून वर्ग झाल्याबाबतची नोंद मी दाखल केलेल्या सदरील खाते उता—यात **(निशाणी क्र. १२०)** नमूद असून त्या नोंदी मी समजण्यासाठी त्याच्या भोवती हिरव्या शाईच्या पेनने वर्तुळ केलेले आहे.

१२. मी एचडीएफसी बॅक, शाखा ठाणे येथिल खाते क्र. ५०१००३८०३०२५९९ यावरुन दि. ०४.०७.२०२२ ते दि. ०६.१०.०२०२४ या कालावधीत प्रज्योत यास मी रु. ०४,९७,१००/— पाठवले होते. त्याचा खाते उतारा मी वर्णन यादी **निशाणी क्र. १०४** सोबत दाखल केलेला आहे. परंतु, अनावधानाने बॅकर बुक्स ऑफ इव्हिडन्स ॲक्ट चे कलम २ ए अन्वयेचे प्रमाणपत्र त्यास जोडण्याचे राहून गेलेले आहे. ते प्रमाणपत्र मी पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे.

(साक्षीदाराने बॅकर बुक्स ऑफ इव्हिडन्स ॲक्ट चे कलम २ ए अन्वयेचे प्रमाणपत्र दाखल करण्यास २ दिवस लागतील असे सांगून सरतपास तहकुब करावा अशी विनंती केली. बचाव पक्षाचे विधिज्ञ यांनी दि. १०.०२.२०२६ रोजी उपलब्ध असल्याने सरतपास दि. १०.०२.२०२६ पर्यंत तहकुब करावा अशी विनंती केली. सबब, साक्षीदार व बचाव पक्षाचे विधिज्ञ यांच्या संमतीने सरतपास दि. १०.०२.२०२६ पर्यंत तहकुब)

**श्रवणोत्तर स्वीकृत,**
स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०६/०२/२०२६.**